# महाराष्ट्र
# व्यापारी व औद्योगिक परिषद

(१९६०)

स्वागताध्यक्ष

**श्री. भा. दि. गरवारे**

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे अध्यक्ष

**प्रा. धनंजयराव गाडगीळ**

व

परिषदेचे अध्यक्ष

**डॉ. चिंतामणराव द्वा. देशमुख**

**यांचीं भाषणें**

---

दिनांक १७ जून १९६०

१२ रॅम्पार्ट रो, फोर्ट
मुंबई १

# श्री. भालचंद्र दिगंबर गरवारे

## यांचें स्वागतपर भाषण

माननीय मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, नियोजित अध्यक्ष डॉ. चिंतामणराव देशमुख, प्राचार्य धनंजयराव गाडगीळ, सन्माननीय पाहुणे आणि स्त्री पुरुषहो,

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाच्या वतीनें भरणाऱ्या महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषदेच्या या अधिवेशनप्रसंगीं स्वागत मंडळाच्या आणि माझ्यातर्फे आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करतांना मला अतिशय आनंद होत आहे.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स या संस्थेच्या विद्यमानें १९५६ च्या डिसेंबर महिन्यांत प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालीं आपण यापूर्वीचें अधिवेशन भरविलें होतें; आणि त्यावेळीं नुकत्याच स्थापन झालेल्या द्वैभाषिक मुंबई राज्यांतील मराठी भाषिक प्रदेशांच्या आर्थिक विकासाचा आपण विचार केला होता. त्याप्रसंगींहि सर्व सदस्यांचें आणि प्रतिनिधींचें स्वागत करण्याचा मान मला मिळाला होता.

१ मे १९६० रोजीं झालेल्या नव महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर, स्वाभाविकच महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला आजची ही व्यापारी व औद्योगिक परिषद भरवावी असे वाटले. या निमित्तानें व्यापार आणि उद्योग क्षेत्रांतील व्यक्तींनीं एकत्र यावें, आर्थिक तज्ज्ञ, विचारवंत, आणि समाजाचे पुढारी यांनाहि बोलवावें, महाराष्ट्रापुढील आर्थिक समस्यांवर मनमोकळेपणानें विचार विनिमय करावा व त्यांतून नवमहाराष्ट्राच्या विकासाचा एक आराखडा तयार करावा म्हणून या परिषदेची योजना केली.

आपले लोकप्रिय मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यानीं आपल्या या परिषदेचें उद्‌घाटन करण्याचें मान्य केलें, याबद्दल मी आपणासर्वांतर्फे कृतज्ञता व्यक्त करतों. महाराष्ट्रा-तील व्यापार, उद्योग आणि सर्वांगीण आर्थिक विकास याबद्दल त्यांच्या अधिकारयुक्त विचारांचा आपल्याला लाभ मिळणार आहे. या पूर्वीच्या परिषदेचेंहि उद्‌घाटन त्यांच्याच शुभहस्तें झालें होतें आणि स्वतःवर नानाविध जबाबदाऱ्या असतांहि राज्याचें उद्योगखातें त्यानीं स्वतःकडे घेतलें आहे, यावरून महाराष्ट्राच्या आर्थिक व उद्योगविषयक प्रश्नांना ते किती महत्त्व देतात हें आढळून येतें.

आजच्या परिषदेचे अध्यक्षस्थान युनिव्हर्सिटी ग्रँटस कमिशनचे अध्यक्ष डॉ. चिंतामणराव देशमुख यांनीं स्वीकारण्याचे मान्य केलें आहे हें मी आपलें अहोभाग्य

समजतो. आजच्या या सभेला डॉ. देशमुखांचा परिचय करून देण्याची आवश्यकता नाहीं. अर्थमंत्री पदावर असतां आपल्या देशाची आर्थिक यंत्रणा त्यांनीं अधिक सुव्यवस्थितपणें बसवली. अलौकिक बुद्धिमत्तेच्या, ज्ञानसंपन्न आणि कर्तृत्ववान् अशा डॉ. देशमुखांचे अधिकार-युक्त संचालन आपणां सर्वांना स्फूर्तिदायक ठरेल यांत शंका नाहीं.

महाराष्ट्रांतील भिन्न भिन्न व्यवसायिकांनीं या परिषदेला जो सक्रिय पाठिंबा दिला आणि दूरदूरच्या जिल्ह्यांतूनहि जे अनेक प्रतिनिधी उपस्थित झाले आहेत त्यावरूनच आर्थिक विकास मंडळानें ही परिषद अगदीं अनुरूपवेळी बोलावली आहे याचें प्रत्यंतर आढळून येतें.

आपली ही परिषद राज्यांतील जनतेच्या उत्साहाला आणि कर्तृत्वाला योग्य वळण लावणारी आणि राज्याच्या प्रगतीपथावर पाऊल टाकण्यास मदत करणारी ठरेल अशी मला उमेद वाटते.

मागील परिषदेनंतर महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई; मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, पुणें; नाग--विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, नागपूर; महाविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज नागपूर, मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीज, जालना; या सर्व संस्थांची एक प्रतिनिधिक संस्था म्हणून "महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ" काम करीत आहे आणि परिषदेचे हेतू व उद्दिष्टें पार पाडण्यासाठीं हे मंडळ कायम स्वरूपाची कामगिरी करूं शकेल अशी योजना आंखण्यांत आली आहे.

या प्रसंगीं, इंडियन मर्चंटस् चेंबर, बॉंबे चेंबर ऑफ कॉमर्स आणि असोसिएशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज या मुंबई येथें कार्य कारणाऱ्या नामवंत संस्थानांहि मंडळानें सहकार्याचे आवाहन केलें आणि मला सांगावयास आनंद वाटतो कीं या संस्थानींहि संपूर्णपणें सहकार्य देऊं केलें असून मंडळाच्या कार्यांत अधिक उत्कटतेनें भाग घेण्याचें ठरविलें आहे. याशिवाय व्यापारविषयक अनेक प्रातिनिधिक संस्थानींहि मंडळांच्या कार्याबद्दल आपुलकी व्यक्त केली असून या सर्वांच्या संघटित प्रयत्नामुळें महाराष्ट्राची औद्योगिक प्रगति, आर्थिक उन्नति व मानमान्यता वाढण्यास अधिक जोराची चालना मिळेल असा आत्मविश्वास वाटतो.

नवमहाराष्ट्रांतील ही पहिली व्यापार व औद्योगिक परिषद भारताचे प्रवेशद्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि सुवेझच्या या पूर्व भागांत व्यापार व उद्योगधंद्याचे प्रमुख केंद्रस्थान म्हणून समजल्या जाणाऱ्या या मुंबई शहरांत भरत आहे हे औचित्याला धरून आहे आणि या शहराचें कर्तृत्व आपल्या राज्यांतील इतर अर्धविकसित व अविकसित भागांना स्फूर्तिदायक ठरेल हे निःसंशय!

महाराष्ट्राच्या सध्याच्या आर्थिक प्रगतीचें स्वरूप थोडेंफार एकांगी आहे. महाराष्ट्रांत अत्यंत उद्योग प्रवीण अशीं कांहीं शहरें आहेत पण त्याचबरोबर राज्याचा किती तरी भाग अतिशय मागासलेल्या स्वरूपांत असल्याचें आढळून येतें. महाराष्ट्राचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीनें मनुष्यबळ व साधनसामुग्री यांचा अधिकाधिक उपयोग कसा करून घेतां

येईल आणि अविकसित व विकसित अशा दोन्ही विभागांच्या प्रगतीचा समन्वय साकल्यानें कसा साधावयाचा हा आपल्या पुढील महत्वाचा प्रश्न आहे. या परिषदेनें राज्याची आर्थिक प्रगती त्वरेनें कशी साधता येईल, बचत योजनेच्या द्वारें भांडवलाची उभारणी कशी करतां येईल, शेतीमध्यें आधुनिक पद्धतींची साधनें कशी वापरतां येतील वगैरे अनेक उपयुक्त प्रश्नांची चिकित्सा करण्याचे ठरविलें आहे. यासाठीं परिषदेनें सहा विषयांची निवड केली असून यासंबंधीचें मसुदे त्या त्या क्षेत्रांतील तज्ञानीं तयार केले आहेत. या विविध प्रश्नावर वेगवेगळ्या समितींमध्यें उहापोह केला जाणार असून या विचार मंथनांतून महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेच्या आर्थिक विकासाला मदत होईल अशी आशा आहे. या समितींमधून केल्या जाणाऱ्या शिफारशी व काढलेले निष्कर्ष यांचा आपले राज्य सरकार योग्य तो परामर्ष घेईल अशी आशा आहे.

राज्याच्या जलद उद्योग प्रवीणतेला प्रामुख्यानें दोन गोष्टींची गरज असते. चालू उद्योग धंद्यांची वाढ आणि नवीन उद्योग धंद्यांची उभारणी. पहिल्या दोन पंचवार्षिक योजनामध्यें बऱ्याच नवीन उद्योगधंद्यांना वाव मिळाला आहे. या दोन्ही पेक्षां अधिक मोठ्या स्वरूपांत आंखलेल्या तृतीय पंचवार्षिक योजनेंत आणखी किती तरी नवीन उद्योगधंद्याना वाव मिळण्याची शक्यता आहे. औद्योगिक प्रांतांत आघाडीवर राहूं इच्छिणारा महाराष्ट्र आपली जबाबदारी अधिक उत्कटतेनें उचलील याबद्दल दुमत नाहीं.

औद्योगिक प्रगतीसाठी 'औद्योगिक शांतते'ची फार मोठी गरज आहे. आपल्या मुख्य मंत्र्यांनीं या बाबत उद्योग प्रमुख, कामगार आणि सरकार या तिघांची एक त्रिपक्षीय परिषद बोलावण्याचें जाहीर केलें आहे ही समाधानाची गोष्ट होय! औद्योगिक शांततेचें महत्व लक्षांत घेऊन सर्वजण याबाबत आपले मुख्य मंत्री व सरकार यांना सहकार्य देतील अशी आशा आहे.

आपल्या परिषदेंत भारत सरकारचे उद्योगमंत्री ना. मनुभाई शहा मार्गदर्शनपर विचार मांडणार आहेत. भारताच्या औद्योगिक विकासाबद्दलची त्यांची ओढ महशूर आहे. नवमहाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला त्यांचें बहुमोल सहाय्य व मार्गदर्शन सातत्यानें मिळत राहील याबद्दल मला किंचितहि संदेह नाहीं.

मला सांगावयास आनंद वाटतो कीं, आपल्या या परिषदेंत सुप्रसिद्ध उद्योगपति श्री. शांतीप्रसाद जैन यांनींहि भाषण करण्याचे मान्य केले आहे. महाराष्ट्रांत कोणते मोठमोठे उद्योग निघूं शकतील याविषयींचा श्री. शांतीप्रसाद यांनीं सखोल अभ्यास केला असून त्यांचे विचार परिषदेच्या सदस्यांना निःसंशय औचित्यपूर्ण वाटतील.

"महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ" मी आतांच सांगितल्याप्रमाणें, १९५६ च्या डिसेंबर मध्यें भरलेल्या मागील परिषदेनंतर अस्तित्वांत आले. मंडळाला पहिल्यापासून प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षीय मार्गदर्शनाचा लाभ झाला. अनेक विषयावरील सखोल

ज्ञान, सरळ आणि स्पष्ट सल्ला आणि प्रत्येक समस्येवर तोड काढण्याची त्यांची कुशलता हा मंडळाचा बहुमोल ठेवा आहे. महाराष्ट्राच्या व भारताच्या अर्थकारणांत दूरदर्शी प्रा. धनंजयराव यांचें मानाचें स्थान आहे. सर्व दृष्ट्या ते आमचे मित्र, तत्वज्ञ आणि मार्गदर्शक आहेत. त्यांच्यावर असलेल्या बहुविध जबाबदाऱ्यांतून त्यांनीं आपला बहुमोल वेळ आमच्या या कार्यांकरितां दिला आणि त्यामुळेंच या विकास मंडळाला आज स्थायी स्वरूप प्राप्त झालें आहे. त्यांच्या या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी तितकी थोडीच होईल.

मंडळाच्या सुरवातीपासून श्री. द. ग. मुल्हेरकर व श्री. म. ना. गोगटे या सन्माननीय चिटणिसांनीं आपली जबाबदारी अत्यंत कार्यक्षमतेनें पार पाडली याबद्दलही मी उभयतांचे आभार मानतों.

शेवटीं, पुनः एकवार आपणा सर्वांचें स्वागत करून, आपणा सर्वांच्या व माझ्यावतीनें मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण, डॉ. चिंतामणराव देशमुख आणि प्रा. गाडगीळ यांना आपल्या आदराचें व प्रेमाचें प्रतीक म्हणून पुष्पहार अर्पण करतों आणि मंडळाचे अध्यक्ष प्रा. धनंजयराव गाडगीळ यांना भाषण करण्याची विनंति करतों.

(मूळ इंग्रजी भाषणावरून)

# प्रा. धनंजयराव गाडगीळ

## यांचें भाषण

माननीय श्री. यशवंतराव चव्हाण, डॉ. चिंतामणराव देशमुख आणि सभ्य स्त्री-पुरुष हो,

महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाच्या वतीनें निवेदन सादर करण्यासाठीं मी आपला थोडा वेळ घेऊं इच्छितों. डिसेंबर १९५६ मध्यें जी महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद भरली तिनें सदर मंडळाला जन्म दिला. त्याच मंडळातर्फे परिषदेचें प्रस्तुत अधिवेशन भरविण्यांत येत आहे. अशा विविध अधिवेशनांतून कार्यक्रमाची जी आंखणी होईल तिची अंमलबजावणी करणें ही मंडळाची जबाबदारी आहे.

डिसेंबर १९५६ सालीं भरलेली महाराष्ट्र व्यापारी व औद्योगिक परिषद हें तिचें आठवें अधिवेशन समजण्यांत येतें. तथापि त्या अधिवेशनांत गतकालीन कार्यपद्धतीचा त्याग करून नव्या दिशेनें वाटचाल सुरू झाली. तत्पूर्वींचीं सर्व अधिवेशनें महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मार्फत भरविण्यांत आली होती. आणि त्यामध्यें प्रायः भूतपूर्व मुंबई राज्यांतील मराठीभाषी प्रदेशांच्या प्रश्नांबाबत विचारविनिमय होत असे. विशाल मुंबई राज्याच्या उदयानंतर १९५६ सालीं पहिलें अधिवेशन भरलें. ह्या राज्यांत मुंबई, मध्यप्रदेश व हैदराबाद ह्या राज्यांमधील सर्व मराठीभाषी जिल्हे प्रथमतः एकत्र आणले गेले. ही घटना लक्षांत घेऊन महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स मुंबईनें औद्योगिक व व्यापारी परिषद भरविण्याच्या कार्यासाठीं नवीन विशाल राज्यामधील मराठीभाषी प्रदेशांतील अन्य प्रमुख व्यापारी संस्थांना पाचारण केलें. त्यामुळें डिसेंबर १९५६ मध्यें जी परिषद भरली तिनें पूर्वीपेक्षां फारच विस्तृत क्षेत्र व्यापलें, तसेंच तिला व्यापक प्रमाणावर पुरस्कर्तेंहि लाभले. क्षितिजाचा असा विस्तार होतांच परिषदेच्या अधिवेशनांत नवचैतन्याचा संचार झालेला दिसूं लागला; नवनव्या प्रवृत्ति तिच्यांत सामील झाल्या आणि विशेष सायासानें जमविलेल्या आंकडेवारीमुळें व अनेक उद्बोधक प्रबंधांमुळें विचार–विनिमयाला विधायक वळण लागलें. परिषदेला एवढें यश मिळालें आणि भावी विकासकार्याचें आव्हान इतकें सुस्पष्ट झालें कीं अधिवेशन समाप्तीपूर्वी परिषदेच्या शिफारशींना मूर्त स्वरूप देणाऱ्या व तिचें कार्य सतत चालविण्याच्या उद्देशानें एक संयोजन समिति स्थापन करण्याचा निर्णय एकमतानें घेण्यांत आला. ह्या संयोजन समितीनें उद्देशपूर्तीसाठीं कायम स्वरूपाचें महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ अस्तित्वांत आणण्याचा निर्णय घेतला. सदर मंडळ जून १९५७ मध्यें मूर्तस्वरूपांत आलें. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई, नाग–विदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, नागपूर, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स पुणें, महाविदर्भ चेंबर ऑफ कॉमर्स, नागपूर आणि मराठवाडा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, जालना ह्या मंडळाच्या संस्थापक घटक संस्था होत. मंडळानें पहिलेंच जर कोणतें काम हातीं घेतलें असेल तर तें म्हणजे मुंबई राज्यांतील मराठीभाषी जिल्ह्यांच्या आर्थिक व

औद्योगिक विकासाबाबत सरकारला सादर करावयाच्या निवेदनासंबंधीचें होय. घटक संस्था व मंडळसंलग्न अन्य प्रतिनिधि ह्यांनीं परिश्रमपूर्वक केलेल्या विविध प्रश्नांच्या सांगोपांग अभ्यासावर सदर निवेदन आधारलें होतें. तसेंच घटक संस्थांच्या प्रतिनिधी मंडळामार्फत भरविलेल्या सभांमध्यें तें मंजूरहि करण्यांत आलें होते. मुंबई राज्याचे मुख्यमंत्री, संबंधित मंत्री व खाते–चिटणीस ह्यांनीं निवेदनावर खुली चर्चा करण्यासाठीं मंडळाच्या सभासदांना भेटण्याचें सौजन्य दाखविलें; सरकारचें हें वर्तन तसेंच सूचनांबाबत झालेला सहानुभूतिपूर्वक विचार निवेदन तयार करणाऱ्यांना अतिशय समाधानदायक वाटलें. निवेदन तयार व सादर करणें ह्याशिवाय मंडळानें मुंबई, नागपूर, औरंगाबाद व पुणें या ठिकाणीं भरलेल्या विविध सभांतून समान व उदयोन्मुख हितसंबंधांचा विचार केला. मंडळाचा संयुक्त कार्यपद्धतीवर विश्वास आहे आणि विविध विभागांत व लोकांत अधिकाधिक ओळख पटत जावी ह्यावर त्यांचा भर आहे. मंडळानें सेल्सटॅक्स् आकारणीसारख्या चौकशीबावतींत साहाय्य दिलें; स्वतःच कांहीं पहाणी करण्याचें मंडळाच्या मनांत होतें. व्यापारनियंत्रक कायद्यांचा कारभार आणि छोट्या धंद्यांच्या, दूरस्थ केंद्रांच्या दृष्टीनें त्यांत सुधारणेची शक्यता, हा त्यांपैकीं एक विषय होता. तथापि, अनेक कारणांमुळें ह्याबाबतींत प्राथमिक चर्चेपलीकडे प्रगतीची मजल गेली नाहीं.

१९५६ सालची परिषद कार्यक्षेत्र व पायाभूत सामर्थ्य ह्या दृष्टीनें संस्मरणीय परिवर्तन करणारी ठरली असें मीं वर म्हटलें आहे. हें परिवर्तन अन्य स्वरूपांतहि दृष्टोत्पत्तीस येतें. व्यापारी वा औद्योगिक वर्गांत जे बसत नाहींत अशांनाहि विचारविनिमय करण्यासाठीं व सल्ला देण्यासाठीं पाचारण करण्यांत आले. १९५६ सालच्या परिषदेंतील चार विभाग अध्यक्षांपैकीं दोन श्री. आर्. के. पाटील व प्राचार्य डी. जी. कर्वे हे होते; आणि त्याहिपेक्षां विशेष म्हणजे ज्यांची आपली प्रवृत्ति डाव्या बाजूला झुकती आहे असा सार्वत्रिक समज आहे अशा एकाला परिषदेचेंच अध्यक्षपद पंडित करण्यास नियंत्रण देण्यांत आलें, ह्या वस्तुस्थितींत वरील स्वरूप निदर्शनास येतें. ही प्रवृत्ति अनिवार्यपणें मंडळांतहि प्रगट झाली; आणि तेथें सर्व प्रश्नांचा व्यापक दृष्टीनें सतत विचार करण्यांत आला. मंडळानें फार मोठी कामगिरी केली असें म्हणतां येत नाहीं; परंतु त्यानें कांहीं महत्त्वपूर्ण प्राथमिक कार्य केलें ह्यांत मात्र शंका नाहीं; संयुक्त स्वरुपाची कार्यकारी संघटना मंडळानें अस्तित्वांत आणली; असमर्थ घटकांच्या प्रश्नाची दखल मंडळ कळकळीनें घेत आलें आहे. तसेंच विशिष्ट हितसंबंधी संघटना असली तरी इतर जनांचें सहकार्य मिळवून ती सर्वहितसंबंधी बनवितां येते ही शक्यताहि मंडळानें निदर्शनास आणली आहे.

अलीकडील राज्य पुनर्घटनेमुळें मोठें स्थित्यंतर घडलें आहे; भूतपूर्व विशाल राज्यांत महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ ह्या नांवानें एक प्रादेशिक संस्था सूचित होई; पण तेंच नांव आतां एकूण राज्याच्या प्रश्नांचा खल करणारें मंडळ व्यक्त करूं लागलें आहे. मंडळाच्या स्वरूपाचा पुनर्विचार करणें हें त्यामुळें क्रमप्राप्त झालें.

नव्या राज्यांतील मंडळाच्या कार्याशीं संबंधित असणाऱ्या सर्व प्रमुख संस्थांना मंडळाशीं संलग्न होण्यासाठीं पाचारण करणें योग्य व हितकारक ठरेल. म्हणून मंडळानें प्रस्तुत परिषद भरविण्याचा जेव्हां कांहीं महिन्यांपूर्वी विचार केला, तेव्हां मंडळाचे सभासद होण्यासाठीं कांहीं महत्त्वपूर्ण संस्थांना आवाहन करणें अगत्याचें आहे असें आमच्या मनाला वाटलें. मंडळाचें सामर्थ्य त्यामुळें खूपच वाढलें हें जाहीर करण्यास मला आनंद वाटतो. इंडियन् मर्चंटस् चेंबर्, मुंबई, बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज, मुंबई, असोसिएशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीज्, मुंबई, ह्यांनीं मंडळाचें सभासदत्व नुकतेंच स्वीकारलें आहे.

राजकीय फेरफारामुळें मंडळाचें स्वरूपच तेवढें बदललें असें नाहीं; तर त्याबरोबरच भावी कार्याची व्याप्ति व उपयुक्तताहि बरीचशी वाढली; ह्या परिषदेमार्फत व मंडळाद्वारें होणाऱ्या कार्याबद्दल मला मोठी आशा आहे. माझ्या ह्या विश्वासाचीं कारणें आणि अपेक्षेचें स्वरूप १९५६ सालच्या परिषदेंतील माझ्या भाषणांतील एका उताऱ्याद्वारें चांगली व्यक्त होतील—

"आपल्यासारख्या चेंबरनें इतक्या व्यापक भूमिकेवरून परिषद बोलाविली असें पूर्वी घडल्याचें मीं ऐकलेलें नाहीं. आपण केलें हें चांगलें केलें, एवढेंच नव्हे तर त्यांत पुढील महत्कार्याचें बीज आहे असें मी समजतों. अनिर्बंध व्यवहाराचें सूत्र चढाओढींत असेल तर नियोजित अर्थव्यवहाराचें सहकार्यांत आहे; आणि हें सहकार्य फार व्यापक, सर्व समाजाचें, त्यांतील सर्व समूहाचें हवें. मोठे, मध्यम, छोटे यांचे अगर निरनिराळ्या प्रदेशांचे हितसंबंध नियोजित अर्थव्यवस्थेंत परस्परविरोधी असूं शकत नाहींत. कारण त्यांना योजनेच्या उद्दिष्टांनीं एकांत गोवलेलें असतें. तेव्हां हीं उद्दिष्टें व तद्भूत आपापलीं कार्यें समजावून घेणें व योजनेंत विसंगति असली, व्यवहारांत अडचणी आल्या तर त्या योजकांस समजावणें, याकरितां सर्वांनीं एकत्र आलें पाहिजे. हें जितक्या व्यापक भूमिकेवर विस्तृत प्रमाणावर होईल तेवढे नियोजन निर्दोष होईल; व समज वाढला, संघर्ष कमी झाले म्हणून त्याची अंमलबजावणीहि सहज व सुकर होईल. हें कोणा व्यक्तीचें काम नाहीं, तसेंच राजकीय पक्षाचेंहि नाहीं. हें कार्य मुख्यत: अर्थव्यवहाराबाबत करावयाचें; त्यांत पुढाकार घेणें आपल्या चेंबरसारख्या संस्थांस इतर कोणापेक्षांहि जास्त सोपें व शक्य आहे. तसेंच हें कार्य सतत चालू ठेवलें पाहिजे. यासहि आपल्यासारख्या समर्थ संस्थेच्या पुरस्काराची गरज आहे. आजची परिषद ही भविष्यांतील या कार्याची नांदी आहे असें मी समजतों. शेतकरी व ग्रामोद्योगी, त्यांच्या सहकारी संस्थाचे प्रतिनिधी, नियंत्रक व सरकारी अधिकारी अशा इतर अनेकांचा विचार-विनिमयांत भविष्यांत समावेश होईल व आपण फक्त व्यावसायिक दृष्टींतून प्रश्नांचा विचार न करतां सगळ्यांस बरोबर घेण्याच्या बुद्धीनें वागतां हें कळल्यावर त्यांत सगळ्यांचें आपणांस पूर्ण सहकार्य मिळेल."

ह्या उताऱ्यांत व्यक्त केलेला दृष्टिकोन मंडळाच्या भावी कार्याची मदार ज्यांच्यावर आहे त्यांना हें संमत होईल आणि १९५७ सालीं स्थापन झाल्यापासून त्याचें आजपर्यंतचें कार्य आपणां सर्वांच्या मनांतील आकांक्षेच्या पूर्ततेच्या दृष्टीनें कांहीं अंशीं तरी घडलें हें आपणांस दिसेल अशी मला आशा आहे.

(मूळ इंग्रजी भाषणाचा अनुवाद)

अध्यक्ष

# डॉ. चिंतामणराव देशमुख

## यांचें भाषण

बहुमानाचें स्थान स्वीकारून प्रमुख भाषण करण्यासाठीं निमंत्रण दिल्याबद्दल अध्यक्षीयच काय, प्रायः कोणत्याहि सार्वजनिक वक्तव्यांत आभारप्रदर्शन करण्याची प्रथा आहे. ह्या प्रथेनुसार प्रस्तुत परिषदेच्या पुरस्कर्त्यांनीं मला अध्यक्ष म्हणून पाचारण केल्याबद्दल मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतों. निमंत्रणाचा स्वीकार करण्यांत मी अविचार तर केला नाहीं ना अशी शंका माझ्या मनाला वाटते. आर्थिक विकासाच्या प्रश्नांशीं माझा अधिकृत व व्यक्तिगत संबंध सरल्याला कांहीं वर्षे झालीं आणि दरम्यानच्या काळांत ज्याला स्थूलमानानें शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्र म्हणतां येईल अशा अगदीं वेगळ्याच क्षेत्रांतील कार्यांत मी गुंतून पडलों. म्हणून ह्या परिषदेंत दोन दिवस ज्या महत्त्वपूर्ण प्रश्नांचा खल होणार आहे त्यांच्याशीं माझा निकट संबंध राहिलेला नाहीं; शिवाय नव्या महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट झालेल्या प्रदेशांच्या विशिष्ट समस्यांचा अभ्यास करण्याची फारशी संधि वा सवडहि मला लाभली नाहीं. तथापि, अशा गोष्टींबाबतची माझी आवड पार नष्ट झालेली नाहीं; जीवनाचीं उपांगें म्हणून शिक्षण व संस्कृति ह्यांचा आर्थिक विकासाच्या बाबींशीं थोडाफार संबंध असतो, आणि सार्वजनिक जीवनांत पडलेल्या व्यक्तीला सामूहिक प्रयत्नांत मदतीसाठीं आवाहन केलें गेल्यास तिनें सहकार्य व साहाय्य नाकारणें युक्त नाहीं, अशी माझी भावना असल्यामुळें हें निमंत्रण स्वीकारण्याशिवाय मला गत्यंतर उरलें नाहीं. म्हणून माझ्यावर सोंपविण्यांत आलेली अवजड कामगिरी पार पाडण्याचा मी प्रयत्न करीत असतो, ह्या व अशा माझ्या मर्यादांची परिषदेंत भाग घेणाऱ्या व्यक्ति जाणीव घेतील असा मला भरंवसा आहे.

आगाऊ तयार केलेल्या छापील अध्यक्षीय भाषणाशिवाय सदर परिषदेंतील चर्चेचें मी अध्यक्ष ह्या नात्यानें मार्गदर्शन, तसेंच तिचा समारोपहि करावयाचा आहे असें कार्यक्रम-पत्रिकेवरून दिसतें. अशा स्वरूपाच्या परिषदेच्या अध्यक्षाच्या कर्तव्याची माझी जी कल्पना आहे, तिच्यावरून मोठ्या लांबरुंद अध्यक्षीय भाषणाची कोणी अपेक्षा बाळगणार नाहीं; शिवाय, ह्या भाषणाच्या तयारीसाठीं पुरेसें साहित्यहि मिळवतां आलें नाहीं; परिषदेच्या चालकांनीं सुजाणपणें महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या विद्यमानें १५ डिसेंबर १९५६ ला भरलेल्या गेल्या परिषदेंतील भाषणांच्या व कार्याच्या अहवालाच्या प्रती मला उपलब्ध करून दिल्या; तसेंच, सदर परिषदेंतील निर्णयानुसार स्थापन झालेल्या महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळानें प्रसिद्ध केलेल्या महत्त्वपूर्ण निवेदनाची प्रतहि त्यांनीं माझ्याकडे पाठविली. हें निवेदन दिनांक २ डिसेंबर १९५७ चें आहे. ह्या निवेदनाद्वारें मुंबई राज्याच्या मुख्य मंत्र्यांपुढें कांहीं सूचना मांडण्यांत आल्या होत्या. सुदैवानें तेच नव्या महाराष्ट्र राज्याचेहि पहिले मुख्य मंत्री आहेत आणि प्रस्तुत परिषदेचें उद्‌घाटन करण्यास त्यांनीं आनंदानें संमति

दिली आहे. सदर निवेदनांचा विषय मुंबई राज्यांतील मराठीभाषी जिल्ह्यांच्या आर्थिक व औद्योगिक विकासाबाबत स्थूल सूचना हा होता. दैवयोगानें हाच प्रदेश आतां थोड्याफार फरकानें नव्या महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट झाला आहे. ह्या अनुषंगानें महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें १९५३ सालींच विदर्भ व मराठवाडा आपल्या कार्यकक्षेंत समाविष्ट करून घेऊन व्यापारी व औद्योगिक जीवनास जी चालना दिली आणि जिचें अनुकरण अनेक घडामोडीं-नंतर राजकीय एकात्मतेंत झालें, तिच्याबद्दल चेंबरला मी धन्यवाद देतों. उपरिनिर्दिष्ट व तदनुषंगिक कागदपत्रांशिवाय माझ्यापुढें हें भाषण लिहितांना परिषदेची कार्यक्रमपत्रिका, सहा विभाग समित्यांद्वारां चर्चिल्या जाणाऱ्या विषयांचा मसुदा, ह्या समित्यांच्या अध्यक्षांचीं व उपाध्यक्षांचीं नांवें, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळातर्फे परिषदेच्या निमित्तानें प्रसिद्ध व्हावयाच्या स्मृतिग्रंथासंबंधीं व तदंतर्गत लेखांच्या संबंधीचें पत्रक इत्यादि सामुग्री होती.

हें साहित्य मनोवेधक व उद्बोधक आहे हें तर खरेंच; तथापि हें भाषण तयार करतांना माझ्याजवळ माजी मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेली औद्योगिक महायोजना, तसेंच महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळानें मुंबई राज्यांतील मराठीभाषी जिल्ह्यांच्या आर्थिक व औद्योगिक विकासासंबंधीं जें निवेदन मुख्य मंत्र्यांना सादर केलें होतें, तत्संबंधीं राज्याकडून काय कृति झाली ह्याबद्दलचें माहितीपत्रक, असे आणखी दोन कागदपत्र असावयास पाहिजे होते अशी माझी इच्छा होती. ह्या अनिश्चिततेंत नव्या महाराष्ट्राच्या तृतीय पंचवार्षिक योजनेच्या व्याप्तीचें व तिचें राष्ट्रीय योजनेबरोबरच्या संबंधाचें संपूर्ण व सुस्पष्ट चित्र माझ्यासमोर नसल्यामुळें आणखी भर पडली. म्हणून प्रस्तुत परिषदेचें फलित म्हणून जें बाहेर पडेल त्यांपैकीं काय दरवाजा ठोठावण्यास उपयोगी पडेल व काय प्रायः काळ्या भिंतीवर डोकें आपटून घेण्यासारखें ठरेल हें मला निश्चित कळत नाहीं. मुख्य मंत्र्यांच्या उद्घाटनपर भाषणाद्वारें अनिश्चितता कांहींशी दूर होईल आणि ह्या परिषदेंतील चर्चेच्या ओघांत कांहीं अस्पष्ट अंगांवर प्रकाश पडेल अशी मला आशा आहे.

विशिष्ट प्रश्नांसंबंधीं काय निर्णय होतील हें भाकीत वर्तविण्याचा परिषदेच्या अध्यक्षपदावर आरूढ झालेल्या व्यक्तीनें यत्न करणें अप्रयोजकपणाचें ठरेल हें स्पष्ट आहे. शिवाय, चर्चेला वळण लावण्याची अवघड जबाबदारी चर्चेच्या अनुरोधानेंच पार पाडणें संयुक्तिक होईल. म्हणून, ह्या प्रास्ताविक भाषणांत मी स्थूल व्याप्तीचें वा मूळ संदर्भाचें निरूपण करावें आणि त्याचबरोबर अशा प्रादेशिक प्रयत्नाच्या मर्यादांचें दिग्दर्शन करावें अशीच रास्त अपेक्षा असणार असें मी मानतों.

ह्या विषयांत शिरण्यापूर्वी महाराष्ट्र राज्यांतील इंडियन मर्चंट्स् चेंबर, बॉंबे चेंबर ऑफ् कॉमर्स आणि इतर व्यापारी संस्थांपुढें स्नेहासाठीं हात पुढें केल्याबद्दल व त्यांचें हार्दिक सहकार्य मिळवल्याबद्दल मी महाराष्ट्र चेंबर ऑफ् कॉमर्सचें व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचें अभिनंदन करतों. नव्या राज्याचा प्रदेश परिषदेच्या उद्दिष्टांतील व भूतकालीन संबंधांतील प्रदेशाशीं समव्याप्त असला, तरी इतर संस्थांच्या समावेशामुळें जें व्यासपीठ निर्माण झालें आहे त्यामुळें परिषदेचें क्षितिज बरेंच रुंदावणार हें उघड आहे. विशेषतः मुंबई

शहराच्या भौगोलिक सीमांपलीकडेहि ज्यांचें क्षेत्र व कार्य पसरलेलें आहे अशा अनेक उद्योगधंद्यांच्या मुख्य कचेऱ्या येथें आहेत; तसेंच ह्या नगराच्या आर्थिक विकासाचे प्रश्न राष्ट्रीय आर्थिक विकासाच्या प्रश्नांशीं एकरूप वा समव्याप्त आहेत. ह्याचाच अर्थ असा कीं प्रस्तुत परिषदेला मुंबई शहरांतील व अवशिष्ट महाराष्ट्रांतील राष्ट्रीय व खाजगी योजनेखालील यशस्वी औद्योगीकरणाकडे जशी नजर ठेवली पाहिजे तशीच स्थानिक गरजांशीं निगडित असलेल्या प्रादेशिक आर्थिक विकासाकडेहि दृष्टि रोखली पाहिजे. विवेचनाच्या सोयीसाठीं हा भेद करणें युक्त असलें तरी प्रादेशिक व अखिल भारतीय विकासांत हितविरोध नाहीं आणि पहिल्या विकासाबरोबर दुसऱ्या विकासाची परिसीमा होत जाण्यानेंच प्रायः पहिल्याचें समर्थन होतें हें जाणलें पाहिजे. मानवी शरिराचा किंवा व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास घडवितांना जसें दुबळ्या अंगाच्या परिपोषाकडे जास्त लक्ष द्यावें लागतें, तशाच प्रकारची ही गोष्ट आहे.

राष्ट्रीय क्षेत्रापुरताच हा युक्तिवाद मर्यादित आहे असें नाहीं. जगांतील अधिकाधिक विचारवंत व मुत्सद्दी तत्त्वतः बऱ्याच प्रमाणांत व वस्तुतः कांहीं प्रमाणांत कां होईना, केवळ राजकीय उपाय म्हणूनच नव्हे तर व्यापक मानवतावादी विचार म्हणून अखिल जगताच्या आर्थिक विकासाच्या गरजेचें व्यावहारिक महत्त्व मान्य करूं लागले आहेत. ही प्रवृत्ति, जगांतील बलाढ्य राष्ट्रांमध्यें तीव्र राजकीय मतभेद असले तरी, हेंच सिद्ध करतें कीं वर्तमानकालीन जग हें भूतकालीन जगापेक्षां अधिक राहण्यालायक झालें आहे आणि भविष्यकाळांत राहणीमानाची पातळी त्वरित वाढण्याची तसेंच भावी पिढ्यांना शांतिसुखाचा आस्वाद मिळण्याची आशा आहे.

ह्या दृष्टिकोनामुळें आपणांस आपल्या देशांतील प्रादेशिक प्रश्नांशीं मुख्य कर्तव्य असलें तरी जागतिक संदर्भानुरोधानें कांहींसा विचार करणें इष्ट ठरेल. ह्या संदर्भानुसार एक नमुना म्हणून पुढील आंकडेवारी उधृत करीत आहें. आर्थिक विकासाच्या अनुबंधांत अत्यंत महत्त्वपूर्ण जागतिक आंकडेवारी म्हणजे स्थिरभावानुसार अमेरिकी डॉलरमध्यें व्यक्त केली जाणारी राष्ट्रवार दरमाणशी वार्षिक उत्पन्नाची आंकडेवारी होय. मला १९५५–५६ सालची ही आंकडेवारी त्वरित मिळूं शकली. ती अशी—

| | | |
|---|---|---|
| युनाइटेड् स्टेट्स् ऑफ् अमेरिका | डॉलर्स | २०३० |
| युनाइटेड् किंग्डम् | ,, | ९०० |
| पश्चिम गोटांतील विकसित राष्ट्रांची सरासरी | ,, | १२९२ |
| युनाइटेड् सोव्हिएट सोशालिस्ट रिपब्लिक् | ,, | १००० |
| जपान | ,, | २३० |
| रिपब्लिकन् चीन | ,, | १७० |
| चीन व्यतिरिक्त अवशिष्ट अर्धविकसित राष्ट्रांची सरासरी | ,, | ८० |
| भारत | ,, | ६१ |

जागतिक सरासरी ३९५ डॉलर्स आहे. ह्यावरून भारत हा जगांतील सर्वांत दरिद्री देश आहे हें सिद्ध होतें. चीन व जपान आज जागतिक सरासरीच्या बरेच खालीं येतात. रशिया विकसित पाश्चात्य राष्ट्रांच्या सरासरी नजिक येऊन ठेपला आहे. अमेरिका ह्या पाश्चात्य

सरासरीच्या मानानें दुप्पट धनसंपन्न आहे. ह्याच संदर्भात जगांतील अधिक विकासित राष्ट्रांना आपलें राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट करण्यास सामान्यतः किती काळ लागला ह्याचाहि निर्देश उद्बोधक ठरेल. हा काळ १५ ते २० वर्षांच्या दरम्यान पडतो; आपल्या योजनेप्रमाणेंहि द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या सफलतेनंतरचें राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट होण्यास किमान १५ वर्षे लागण्याचा संभव दिसतो. ज्या जपानकडे आपण अनेक कारणांस्तव उत्तम आदर्श म्हणून नजर राखणें इष्ट आहे तेथेंहि राष्ट्रीय उत्पन्नाच्या वार्षिक वाढीचें प्रमाण खपच उच्च असल्यामुळें १० वर्षांतच आपलें राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट वाढवूं शकूं असा त्यांना भरंवसा वाटत आहे.

आंकडेवारीचें दुसरें एक कोष्टक मी सादर करूं इच्छितों. वर उल्लेखिलेली राष्ट्रीय उत्पन्नाची तसेंच ही देखील आंकडेवारी मी प्राध्यापक पी. सी. महालनोबिस ह्यांच्या भाषणावरून उध्दृत केली आहे :—

**माणशी—वार्षिक**

| राष्ट्राचें वा राष्ट्रसमूहाचें नांव | राष्ट्रीय उत्पन्न अमेरिकी डॉलर्स | पोलाद किलोग्रॅम् | विद्युत् किलोवॅट | वैद्य—डॉक्टर (दहा हजार लोकसंख्या) | प्राथमिक शालेय विद्यार्थी (दहाहजार लोकसंख्या) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका | २०३० | ६४२ | ३८१२ | १३·२ | १५८ |
| युनाइटेड किंग्डम | ९०० | ३९४ | १८४६ | १६·७ | १०८ |
| सर्व विकसित राष्ट्रें | १२९२ | ४३६ | २५२७ | ११·५ | १३२ |
| युनाइटेड सोव्हिएत सोशॅलिस्ट रिपब्लिक | १००० | २२६ | ८५० | १४·९ | ६५ |
| चीन | १७० | ४·८ | २० | १·२ | ८७ |
| सर्व समाजवादी राष्ट्रें | ३१७ | ७२ | ३४० | ५·९ | ९० |
| जपान | २३० | १०५ | ७२१ | १०·५ | १४४ |
| सर्व मध्यम राष्ट्रें | २५९ | ३८ | ३६० | ७·३ | ११६ |
| भारत | ६१ | ४·५ | २१ | १·३ | ५४ |
| चीन व्यतिरिक्त सर्व अर्ध-विकासित राष्ट्रें | ८० | २ | २८ | १·४ | ६५ |
| चीनसहित सर्व अर्धविकसित राष्ट्रें | ७६ | ३ | २५ | १·३ | ७४ |
| जागतिक | ३९५ | १०६ | ६११ | ५·५ | ९२ |

प्राध्यापक रॉस्टोव ह्यांनीं आपल्या लिखाणाद्वारें प्रचलित केलेल्या शब्दप्रयोगाप्रमाणें आपण कोणाच्या आधारासह किंवा आधाराशिवाय आपलें उड्डाण पुरें करीपर्यंत, किंवा विकसित राष्ट्रांच्या मालिकेंत समावेश होण्याची आपली लायकी आहे, असें आपण मानूं लागेपर्यंत, आपणांस खूपच लांब मजल मारावयाची आहे हें आपण भारतीयांनीं, विषाद-जनक असलें, तरी पुनश्च एकवार ध्यानांत बाळगलें पाहिजे. आर्थिक विकासांत रस घेणाऱ्या प्रत्येकाला प्राध्यापक रॉस्टोव लवकरच आपल्या देशाला भेट देण्याचा संभव आहे, हें वृत्त वाचून आनंद झाला असेल. त्यांचा सिद्धांत आर्थिक विकासाच्या प्रक्रियेंत नियोजनाला महत्त्वपूर्ण स्थान नाकारीत असल्यामुळें, त्यांच्या आगामी भेटीच्या पोटीं आपल्या देशांतील नियोजकांना व अर्थशास्त्रज्ञांना जें आव्हान आहे त्याच्या परिणामांकडे प्रत्येकजणानें सुखद अपेक्षेनें पाहण्यास हरकत नाहीं.

आपल्या आर्थिक प्रश्नांच्या भव्य कक्षांचें केवळ ज्ञान झालें म्हणजे त्यावर लगेच उत्तर सांपडलें असें मुळीच नव्हे. अर्धविकसित राष्ट्रांतील आर्थिक विकासाच्या उथळ अभ्यासकालाहि ह्याचीं कारणें अवगत असतात. तथाकथित समाजवादी राष्ट्रांनीं उध्दृत केलेल्या वस्तुस्थितीं-बद्दल व आंकडेवारीबद्दल कोणी कितीहि शंका घेतली, तरी त्या राष्ट्रांतील आर्थिक विकासाचा वेग पाश्चात्य संसदीय लोकशाही पद्धतीचा निःसंशय यथायोग्य स्वीकार केलेल्या आपल्या सारख्या राष्ट्रापेक्षां कांहीं काळ तरी अधिक राहणार ह्याबाबत बिलकुल शंका नाहीं. तथापि एकदां आपण उड्डाण पुरें केलें कीं मध्यम विकासवस्थेंतील जपानसारख्या लोकशाही राष्ट्रालाहि आर्थिक विकासाचा वेग अधिक जर न झाला तर निदान समाजवादी राष्ट्राच्या बरोबरीचा तरी संपादन करणें शक्य आहे हें लगेच मी येथेंच सांगून टाकतों. म्हणून विकसित राष्ट्राची प्रतिष्ठा प्राप्त होण्यासाठीं पूर्वावश्यक गरज जर कोणती असेल तर ही उड्डाणाची तयारी आहे हें स्पष्ट आहे. ही तयारी जर परदेशी मदत वाजवी प्रमाणांत मिळत राहिली तर भारत १९७६ सालापर्यंत करूं शकला पाहिजे, असें आपल्या नियोजन अधिकाऱ्यांचें मत आहे. भारतांतील सर्व सरकारांनीं तसेंच साऱ्या व्यक्तींनीं व संस्थांनीं ही उड्डाणाची तयारी यशस्वी करण्याच्या प्रयत्नावर शक्य तों भर दिला पाहिजे हें उघडच आहे. कांहींसें असंभाव्य वाटत असलें तरी ह्या कालखंडहि प्रत्येकानें प्रयत्नांची आणखी शिकस्त केली तर कमी करतां येणें अशक्य नाहीं. राष्ट्रीय उत्पन्नाच्या गुंतवणुकीचें प्रमाण प्रतिवर्षी वाढविण्याकडे मुख्यतः लक्ष दिलें पाहिजे. प्रथमतः विद्यमान उत्पादन साधनांच्या सहाय्यानें कमाल उत्पादन सीमा गांठली आणि चालू व्ययावर कमाल व्यवहार्य नियंत्रणें लादलीं तर हें प्रमाण वाढूं शकेल. पहिलें ध्येय गांठण्यासाठीं आजवर आपल्या देशांत दिसलेल्या कारभारविषयक कार्यक्षमतेपेक्षां अधिक कार्यक्षमतेची गरज आहे; दुसरें, साध्याची सिद्धि राष्ट्रांतील सर्व वर्गांच्या दैनिक प्रामाणिक कामासंबंधींच्या दृष्टिकोनावर अवलंबून आहे. राजकीय आणि अन्य लोकनायकांनीं धैर्यानें नवविचार जागृतीचें महत्त्वपूर्ण कार्य हातीं घेतलें तर दृष्टिकोनहि अनुकूल करून घेतां येतात. ह्या दोन्हीहि बाबतींत विद्यमान सरकारें कसाला उतरलीं नाहींत ही माझी भावना व्यक्त केल्यावांचून मला राहवत नाहीं; आणि मूलभूत दृष्टीनें पाहिल्यास

ह्याच बाबतींत नव महाराष्ट्र राज्याला, मनांत आणलें तर, देशाला उत्कृष्ट कित्ता घालून देतां येईल.

शक्याशक्यतेच्या कमाल परिसीमा कांहींहि असोत, आणि कितीहि उमदे आविर्भाव आणले जावोत, तृतीय पंचवार्षिक योजना सुरक्षित धोरण अनुसरणार आणि राष्ट्रीय उत्पन्नांत ६ टक्केवाढीचें उद्दिष्ट ठेवणार असाच संभव आहे. ह्या योजनेचें आकारमान समाजवादी राष्ट्रांप्रमाणें अवाढव्य नाहीं हें विसरतां कामा नये; त्याची व्याप्ति आतां १०,००० कोटी रुपयांच्या आसपास ठरल्यासारखीं दिसते; त्यापैकीं अदमासें ⅔ सरकारी आणि ⅓ खाजगी अशी विभागणी होणार असें वाटतें. ह्या सर्वंकष मर्यादा सरकारी व प्रादेशिक मर्यादांनुसार बऱ्हंशीं परस्पर विचारविनिमयानंतर निश्चित झाल्या असल्या तरी अद्यापि जाहीरपणें प्रगट केलेल्या नाहींत. तें कांहींहि असलें तरी नव महाराष्ट्र राज्य आपल्या योजने-द्वारें आर्थिक विकास प्रयत्नांची परिसीमा निश्चित करील आणि प्रस्तुत परिषद सध्यांच्या अवस्थेंत संकल्पित योजनेच्या कक्षा अंदाजानें करून तदंतर्भूत शक्य तेवढा निश्चित व उपयुक्त अग्रक्रम निर्दिष्ट करील अशीच कोणाचीहि अपेक्षा राहील.

प्रादेशिक विषमतेचें उच्चाटन ह्या तत्त्वाला सिद्धांत म्हणून सार्वदेशीय मान्यता मिळालेली दिसत असली तरी भारतीय नियोजनाच्या अस्मितेला अलंकृत करणाऱ्या कोणत्याहि अन्य तत्त्वापेक्षां ह्याचा आचार फार कमी घडतो. ह्याचें मुख्य कारणहि असें आहे कीं, भारतांत प्रदेश म्हणून ज्यांना ओळखलें जातें ते केवळ, एकदोन अपवाद वगळल्यास भाषेसारख्या महत्त्वपूर्ण कारणांमुळें कांहींसे एकजिनसी बनलेले, राजकीय विभागच असतात. अर्थशास्त्रदृष्ट्या प्रदेशाचा एकजिनसीपणा हा त्याच्या राजकीय संघटनेवरून इतकासा ठरत नाहीं, भाषेमुळेंहि घडत नाहीं; तर तो भौगोलिक, स्थलविशेषत्व, पर्जन्यमान, निसर्गसंपत्ति, दळणवळण आणि अशींच अन्य वाहतुकीचीं साधनें वगैरेंवरून ठरविला जातो. अशा वास्तविक प्रदेशसीमा निश्चित करण्याचें कार्य अद्यापि व्हावयाचेंच आहे. ह्या संबंधीं महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळानें १९५७ सालच्या निवेदनांत जी एक शिफारस केली ती पाहून मला आनंद झाला. नियोजन मंडळाच्या आदेशान्वयें प्रत्येक राज्याला जिल्हावार आर्थिक तपशीलवार पहाणी करण्यास सांगण्यांत यावें; तिचा उद्देश त्या प्रदेशांतील मोठ्या, मध्यम व छोट्या उद्योगधंद्यांच्या विकासक्षमतेचें ज्ञान मिळविण्याचा असावा; तसेंच शेती, जंगलें, खाणी व सागरी संपत्ति ह्यांच्या उपयोगाच्या दृष्टीनेंहि ही पहाणी व्हावी, अशी ती शिफारस होती; ही माझ्या मनांत दीर्घकाळ घोळणाऱ्या कल्पनेच्या धर्तीची शिफारस आहे. माझ्या कल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचें साधन माझ्याजवळ नव्हतें; तरी पण देशांतील अर्थशास्त्रज्ञांना व अर्थशास्त्रीय संस्थांना अशी पहाणी हातीं घेण्यासाठीं प्रवृत्त करण्याची संधि मी केव्हांहि वायां दवडली नाहीं; एका मोठ्या संस्थेमार्फत असा प्रारंभ केला जाण्यास मी कारणीभूत झालों अशी माझी धारणा आहे. भारत सरकारच्या आरोग्य खात्यांतील एक विभाग अशी सामुग्री गोळा करीत आहे कीं, ज्यांना सत्यार्थानें प्रदेश म्हणतां येईल अशा भूभागांच्या परिस्थितीचा अभ्यास व ओळख पटण्यास उपयुक्त ठरेल.

प्रादेशिक विषमतेच्या अभ्यासाशीं निगडित असलेल्या कोणत्याहि संस्थेला ही सामुग्री पाया म्हणून सहाय्यक ठरेल. अशा काळजीपूर्वक व शास्त्रीय पद्धतीनुसार अभ्यासाच्या अभावीं विषमतेच्या उच्चाटनाचे प्रयत्न केवळ भावनाप्रधान व दैववादी उपक्रम ठरेल.

आर्थिक नियोजनाची गरज म्हणून विद्यमान राजकीय संघटनेंत कांहीं क्रांतिकारक बदल वा तत्त्वप्रतिपादन करण्याचा माझा इरादा नाहीं. मात्र आपल्यापुढील समस्यांची स्वच्छ ओळख पटवून घेणें आणि कालांतरानें कां होईना, पण त्यांवर यथायोग्य शास्त्रीय उपाय शोधून काढण्यासाठीं बद्धपरिकर होणें अगत्याचें आहे. मगच शासनसंस्थेला व अन्य अंमलबजावणी करणाऱ्या संघटनांना राष्ट्रीय प्रयत्नांत सर्वस्व वेंचण्यासाठीं आम जनतेला आवाहन करण्याचा अधिकार प्राप्त होईल.

महाराष्ट्रापुरतें बोलावयाचें झाल्यास, सदोष राजकीय रचनेमुळें त्याच्या आर्थिक विकासावर भूतकालांत विपरीत परिणाम झाला हें सिद्ध करणें अवघड नाहीं. मराठवाड्याच्या बाबतींत तर अशी उपेक्षा शतकानुशतकें इतिहासप्रसिद्ध व सहेतुक झाली. विदर्भाकडेहि राजकीय बुद्धीनें दुर्लक्ष केलें गेल्याचा पुरावा सांपडतो. स्वातंत्र्योत्तर दहा वर्षांत प्रादेशिक विषमतेचें निर्मूलन करणाऱ्या कोणत्याही सुविचारी योजनेंत ह्या हयगयीचें समर्थन होऊं शकणार नाहीं. पश्चिम महाराष्ट्रावर तर अशा अन्याय्य वागवणुकीचा कळस झाला. ह्या वर्तणूकीस सापत्नभाव म्हणणेंहि युक्त होणार नाहीं; कारण सापत्नभावांतीलहि मातृदृष्टि त्याच्या वांट्यास आली नाहीं. पश्चिम महाराष्ट्रांतील कोंकणचें मागासलेपण गेल्या दोन-तीन वर्षांत कोठें लक्षांत येऊं लागलेलें दिसतें; पण तेंहि राज्य सरकारच्याच ! माझ्या माहितीप्रमाणें खऱ्याखुऱ्या कोंकण लोहमार्गाची योजना गेलीं दहा वर्षें विलंबित आशेमुळें हृदयव्यथा जडावी अशी सतत लांबणीवर टाकण्यांत येत आहे. म्हणून हृदयसंशोधनाची बरीच गरज आहे; आणि महाराष्ट्रांतील ज्या प्रदेशांची राज्यभेदामुळें वा प्रादेशिक भेदामुळें गतकाळांत उपेक्षा झाली, त्यांची भरपाई करून देणें जरूर आहे. ह्यापूर्वीच्या अधिवेशनांद्वारें परिषदेनें ह्या बाबतींत चालना दिली. तीच प्रथा प्रस्तुत परिषद तिच्यांत सामील झालेल्या नव्या महत्त्वपूर्ण घटकांच्या अनुमतीनें चालवील अशी आशा आहे.

सार्वजनिक जीवनांत लबाडी विरोधाच्या निर्मूलनाइतकें कशासहि महत्त्व नाहीं. अवशिष्ट महाराष्ट्राच्या औद्योगीकरणाची गति वाढविणारी योजना आंखणें म्हणजे मुंबई शहराशीं शत्रुत्व करणें नव्हे. मुंबई शहर हें कांहीं कोणाचें वतन नाहीं; तर राज्याच्या आर्थिक संघटनेचा सदर शहर हा शिरोबिंदु आहे. शरीर आणि शिरोबिंदु ह्यांच्यामध्यें घनिष्ठ संबंध असतो आणि तो वाढविणें हेंच प्रत्येकाचें कर्तव्य ठरतें. निसर्गसंपत्ति, दळणवळण, विद्युत् वा जलशक्ती इत्यादि आवश्यक साधनांच्या अनुषंगानें विचार करून प्रदेशभर आर्थिक विकासासाठीं पद्धतशीर विखुरलेलीं केंद्रें हेतुपूर्वक निर्माण करण्याचा जो औद्योगिक आदर्श मांडला जातो, त्यांत बरेंच तथ्य आहे असें मला वाटतें.

दुसरा खोटा विरोध राष्ट्रीय व खाजगी विभागासंबंधांत आहे. औद्योगिक धोरणविषयक निवेदन प्रसिद्ध झाल्यापासून ह्याबाबतींत निष्फळ वाद चाललेला आहे. ह्या प्रश्न सैद्धांतिक

नाहीं वा विशिष्ट मनोवृत्तीचा नाहीं, तर वस्तुनिष्ठ निर्णयाचा आहे; विशिष्ट निर्णयाबाबत मतभेदास नेहमींच वाव असतो. उदाहरणार्थ, प्रस्तुतचा छोट्या मोटारीचा प्रश्न. पण एकदां निर्णय झाल्यावर प्रत्येक वेळीं आपलाच ध्वज मिरवण्याची गरज नाहीं. जें परिणामीं चांगलें, तेंच चांगलें. देशाला उत्कृष्ट कामगिरीची गरज आहे. मग ती कोणाचीहि असो! राष्ट्रीय व खासगी उद्योगधंद्यांचे स्वाभाविक गुणावगुण आतां चांगले ज्ञात झाले आहेत; पण अशा सर्व सामान्य सिद्धांतावरून निर्णय करणें योग्य होणार नाहीं. राज्यघटनेनुसार लोकशाही समाजवादाचा अंगिकार केल्यामुळें त्या तत्त्वानुरूप केवळ सर्वांगीण राष्ट्रीय हितबुद्धि दृष्टीसमोर ठेवून, वस्तुनिष्ठ दृष्टीनें तारतम्य बाळगिलें पाहिजे.

खोट्या विरोधासारखाच समाजशास्त्रीय सिद्धांत म्हणून खोट्या कल्पना प्रचलित आहेत; उदाहरणार्थ, विशिष्ट भाषी समाज व्यापारी होण्यास नालायक आहे. ह्या कल्पना खोट्या आहेत. ह्याचें कारण आपल्या डोळ्यासमोर चाललेल्या समाजशास्त्रीय व तांत्रिक स्थित्यंतराकडे त्या दुर्लक्ष करतात. आधुनिक व्यापाराच्या पद्धति गतकालापेक्षां सर्वस्वी भिन्न आहेत. सर्व देशांत नवा व्यवस्थापक वर्ग उदयाला आला आहे, ही नवी महत्त्वपूर्ण घटना आहे—भविष्यकाळ ह्या व्यवस्थापकीय शासनाचा आहे. जगांत—विशेषत: भारतांत धंदेवाईकपणाचें स्वरूप बदललें आहे व बदलत आहे. राजकारणाप्रमाणेंच व्यापारांतहि परंपरा–ज्ञाति–समाजनिरपेक्ष आवश्यक गुणवत्ता, चौरस बुद्धिमत्ता लागते, हें आतां मान्य झालें आहे. व्यापार वा उद्योग परंपरागत हितसंबंधियांच्या नियंत्रणाखालीं आहेत ह्या कांहीं तेच तेवढे ह्या अधिकार पेहलण्यास फार लायक आहेत ह्याचा, किंवा धंदेवाईकपणाच्या बाह्यरूपांत फेरफार झाला तर तो देशाला हानिकारक ठरेल ह्याचा पुरावा नाहीं.

माझ्या मतें अशा परिषदेचें मुख्य कार्य म्हणजे जो जो व्यापारी होण्यास स्वभावत: लायक आहे, ज्यानें विचार केला आहे व जो शिक्षण घेऊन तयार झाला आहे त्याला त्याला व्यापारांत व उद्योगांत प्रवेश करण्याची सोय उपलब्ध करून देणें हें आहे. अशा लायक व्यक्तींचा शोध शक्यतितका व्यापक व विचारपूर्वक व्हावा. त्यांची निवड व विकास करण्यांत शक्य तेवढा पूर्वसंकल्पित धोकाहि पत्करावा; नियोजनबद्ध अर्थव्यवस्थेंत सुदैवानें नव्या सत्पात्र व्यक्तींना सामावून घेण्यास खूपच वाव आहे. व्यापारांत अगोदरच सुस्थिर झालेल्या व्यक्तींना लाभणारी अमाप संधि त्यांनाहि मिळणें शक्य आहे. राजकारणापेक्षांहि उद्योगधंद्यांत लोकांना निवडीसाठीं विस्तृत क्षेत्र निर्माण करून देणें जास्त अगत्याचें आहे. अधिकारपदामुळें राजकारण्यांच्या वर्गांत खोगीरभरती झाल्यामुळें राजकारणाची हानि झाली आहे. पण व्यापाऱ्यांच्या रांगेंत न्याय्य, सुजाण, पूर्व नियोजित पद्धतीनें भर पडली तर ती फार फलदायक ठरेल. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासासाठीं तर ती आत्यंतिक गरज म्हणून वर्णिता येईल.

व्यापारासाठीं लायक उमेदवारांची विस्तृत क्षेत्रांतून निवड करण्याच्या ह्या योजनापूर्व प्रयत्नांत भांडवली व शैक्षणिक संस्थानाहि भाग घेतां येईल. शैक्षणिक संस्थांनीं लायक उमेदवार

हेरावे व त्यांच्या प्रगतीसाठीं झटावें; भांडवली संस्थांनीं उद्योगधंद्यांत प्रवेश करणाऱ्यांना उत्तेजन म्हणून भांडवलाच्या सवलती उपलब्ध करून द्याव्यात. सरकारी नियंत्रक संघटनांनींहि उद्योन्मुख लायक व्यक्तींना सक्रिय उत्तेजन देण्यास पुढें यावें. थोड्या हातीं सत्ता व सामर्थ्य केंद्रित होणार नाहीं आणि संधि मिळण्याच्या बाबतींतहि मक्तेदारी राहणार नाहीं अशी खबरदारी घेतली पाहिजे.

व्यापारी जगांत असा फेरफार व समृद्धि झाली तर औद्योगिक शांततेला अनुकूल असे सुपरिणाम घडून येतील. कामगारवर्गाच्या मनोवृत्तींत अनुकूल बदल निःसंशय होईल. आपण धनिकांची तुंबडी भरण्यासाठीं खपतों ह्या अस्वस्थताजनक विचारापासून कामगार बराचसा मुक्त होईल आणि मालक व मजूर ह्या दोघांनाहि मूक ग्राहकांच्या हितसंबंधाकडे लक्ष देण्यास प्रवृत्त करणें अधिक सुलभ होईल.

परिषदेच्या एका विभाग समितींत शेतीचा महत्त्वाचा विषय चर्चिला जाणार आहे हें पाहून मला आनंद वाटला. शेती व उद्योग हे परस्परविरोधी नाहींत; उलट ते परस्पर-पोषक आहेत; प्राथमिक अवस्थेंत तरी औद्योगीकरणास लागणारी अतिरिक्त साधनसंपत्ति कांहीं झालें तरी शेतींतून यावयास हवी. प्रत्येक पंचवार्षिक योजनेची यशस्विता दरवर्षी शेतीविषयक उद्दिष्टें यशस्वीरीतीनें गांठण्यावर अवलंबून आहे. ह्यांत अपयश आलें तर परदेशी मदतीनेंहि भरपाई होणार नाहीं; द्वितीय पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या दोन वर्षांत जसें घडलें तसें म्हणजे अन्नधान्याची टंचाई व कच्च्या मालाची चणचण भासूं लागेल; त्याचा परिणाम भावकोष्टकें विकृत होऊन अंदाज चुकण्यांत घडेल. योजनेच्या कार्याला तडा जाईल; आणि ज्यांचें उत्पन्न निश्चित आहे त्या समाजांतील बहुसंख्य घटकांवर आपत्ति कोसळेल.

कच्च्या मालासंबंधीं बोलावयाचें तर केंद्र सरकार जें परदेशी चलन औद्योगिक कच्च्या मालासाठीं पुरवतें व येथील इंजिनिअरिंग वगैरे उत्पादन शक्तीला जो वाव देऊन निर्यात वाढवतें, तें धोरण पुरेसें कल्पक आहे अशी माझी खात्री नाहीं.

माझें भाषण संपवून मुख्य मंत्र्यांना परिषदेचें उद्‌घाटन करण्याची विनंति करण्यापूर्वी व्यापारी वर्गाकडून नेहमीं नियंत्रक अधिकाराच्या वापराबाबत कारभाराविरुद्ध जी अक्षम्य विलंब व दप्तरदिरंगाई ह्यासंबंधीं तक्रार केली जाते तिचा मी उल्लेख करूं इच्छितों. ह्या तक्रारी पुष्कळदां साधार असतात अशी माझी खात्री आहे.

खातीं योग्य, कार्यक्षम व कामसू मंत्र्यांकडे सोंपविलीं आणि विधिमंडळांनीं व तद्‌लग्न समित्यांनीं सत्ताधारी अधिकाऱ्यांच्या निर्णयप्रमादाबाबत सुज्ञ भूमिका धारण केली, तर ह्या विलंब व दप्तरदिरंगाई कमी करणें सरकारच्या सामर्थ्याबाहेरचें आहे असें मला वाटत नाहीं.

आतां मी मुख्य मंत्र्यांना परिषदेचें उद्‌घाटन करण्याची विनंति करतों.

---

(मूळ इंग्रजी भाषणाचा अनुवाद)

प्रकाशक : रा. ग. मोहाडीकर, कार्यालय चिटणीस, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ, १२ रॅम्पार्ट रो, मुंबई १
मुद्रक : वि. पु. भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी गिरगांव, मुंबई ४